Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# प्रायोगिक रंगभूमी : एक अभ्यास





**प्रा. निरज बोरसे**
संशोधक विद्यार्थी, नाट्यशास्त्र विभाग
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
Email ID : nrjbb122@gmail.com

**प्रा.डॉ. चंद्रशेखर कणसे**
मार्गदर्शक, नाट्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय
सिरसाळा, ता. परळी वै. जि. बीड
Email ID : drcbkanse21@gmail.com

## Abstract

नाटक हा साहित्यातील महत्वाचा प्रकार आहे. ज्याला दृश्य आणि श्राव्य रुप आहे. मराठी रंगभूमीचा नाट्यकलेचा इतिहास लक्षात घेता रंगभूमीच्या प्रत्येक वळणावर रंगभूमीच्या संकल्पनेत, स्वरुपात बदल होतांना दिसतो. विविध नाट्यप्रवाह मराठी रंगभूमीवर निर्माण झाले. हौशी, व्यावसायिक, प्रायोगिक, समांतर, पथनाट्य, दलित, संगीत रंगभूमी असे अनेक प्रवाह रंगभूमीवर स्वत:च अस्तित्व निर्माण करीत स्वतंत्र ओळख देऊ लागले. लोकधर्मी नाट्य ते प्रायोगिक रंगभूमी असा प्रवास रंगभूमी करताना दिसत आहे. या सर्वाच्या सरमिसळीतून नवीन नाट्यप्रयोग जन्मास येवू लागलेले दिसातायेत. त्याला अपवाद प्रायोगिक रंगभूमीही नाही.

**Keywords :** नाटक, रंगभूमी, लोकधर्मी नाट्य, प्रायोगिक रंगभूमी, नवीन नाट्यप्रयोग

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

## Research Paper

उद्देश : प्रायोगिक रंगभूमीची व्याख्या, संकल्पना आणि स्वरुप समजावून घेणे.

गृहीतके : प्रायोगिक रंगभूमीवर आशय आणि अभिव्यक्तीचे प्रयोग केले आहेत.

संशोधन पध्दती : शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पध्दती आणि ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा विचार केला आहे.

उद्दिष्टे :

- 'प्रायोगिक रंगभूमीची' व्याख्या माहिती करुन घेणे.
- 'प्रायोगिक रंगभूमीची' संकल्पना समजावून घेणे.
- 'प्रायोगिक रंगभूमी' चे स्वरुप समजावून घेणे.

प्रायोगिक रंगभूमी :

मराठी नाटकात 'प्रायोगिक' हा शब्द इंग्रजीतील 'एक्सपीरिमेंटल' या अर्थाने वापरला जातो. म्हणजेच प्रायोगिक रंगभूमी अर्थात 'एक्सपीरिमेंटल थिएटर' प्रायोगिक या शब्दात 'प्रयोग' हा शब्द दडलेला आहे. 'प्रयोग' म्हणजे नाटकाच्या संदर्भातील जे 'खेळ' करणे आणि दुसरा अर्थ या खेळात 'नवे' आणि वेगळे शोधणे', शक्यताचा शोध घेणे या अर्थाने वापरला जातो. प्रायोगिकता याची व्याख्या आणि संकल्पना समजावून घेवू. प्रायोगिकतेच्या संदर्भात अनेक साहित्यिक, नाट्यसमिक्षिंनी व्याख्या केल्या आहेत. प्रायोगिकता म्हणजे

> ''ज्या नाट्यकृतीमधून नाटकांचे 'बाह्य' रुप शैलीच्या संदर्भात व 'अतरंग' आशयाच्या संदर्भात बदलत जाऊन 'शैली' व 'आशय' हे एकमेकात मिसळून जातात. कारण त्याशिवाय जी नाट्यकृती उभीच राहू शकणार नाही हा 'नवेपणा' म्हणजे प्रायोगिकता होय. स.शि.भावे या सदंर्भात आपलं मत मांडतांना म्हणतात, '''नवे' आणि 'हौशी' म्हणजे 'प्रायोगिक' नव्हे, हे मान्य झाले म्हणजे 'प्रायोगिक' चा अर्थ सोपेपणाने स्पष्ट होईल. जाणीवपूर्वक, मनाशी काही हेतू धरुन, नवी वाट चालून पाहणे, अशी प्रायोगिकतेची सुटसुटीत व्याख्या करता येईल''[१].

प्रायोगिक रंगभूमीवर हेतूपूर्ण ठरवून आशयात व अभिव्यक्तीत प्रयोग करत राहणे म्हणजे प्रायोगिकता असे म्हणता येईल. राजीव नाईक म्हणतात

> ''आशय आणि अभिव्यक्ती दोन्हींत सतत काहीतरी नवीन करुन पाहणं, शोधणं हे तिच ध्येय असतं. जी रंगभूमी आशय - अभिव्यक्तीमध्ये संहितेत वा सादरीकरणात - काही प्रयोग करु पाहते, ती प्रायोगिक रंगभूमी होय[२]''.

लेखक, कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञ स्वत:ला समजावून घेण्यासाठी, तपासण्यासाठी नवे काही आणून तटस्थपणे, आतल्या जाणिवेने, बंधनातून पारंपरिक साचे संकेत तोडत असतात. हे करताना प्रत्येकजण प्रयोगशील राहण्याचा प्रयत्न करतो. नाटकाच्या सादरीकरणाच्या संदर्भात या प्रयत्नांना प्रायोगिकच म्हटले पाहिजे. याच संदर्भात वसंत आबाजी डहाके म्हणतात

> ''चालत आलेल्या परंपरेहून काही निराळे करु पाहणे, माध्यमाच्या शक्यता शोधणे, आशयानुरुप अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न करणे यातून कलांमध्ये प्रायोगिकता उत्पन्न होते. ती अज्ञात प्रदेशातील वाटचाल असते. कलांमधल्या अभिव्यक्तीच्या प्रसंगानंतरच प्रायोगिकतेचे रुप कळते व यशापयश जोखता येते. नटाचा अभिनय, नेपश्य, प्रकाशयोजना, संगीत, दिग्दर्शन आणि नाट्यसंहिता अशा विविध अगांनी प्रायोगिकता व्यक्त होत असते. रंगभूमी तज्ज्ञ आणि रंगकर्मी या विविध अंगातल्या शक्यतांचा शोध घेतात. नाटककाराने लिहीलेले नाटक,

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

अभियनयकुशल नट आणि स्थळे सुचवणारे पडदे आणि प्रेक्षक असले की नाटकं होते, लिखित संहितेची देखील गरज नाही. इथपर्यंत नाट्यविचार आता गेलेला दिसतो.३''




प्रत्येक कलावंत नवं, वेगळं, आशयाला पूरक असे बदल करीत नवसंकेताना जन्म देऊ पाहत असतो. असलेल्या संकेतांमध्ये तो जाणिवपूर्वक भर घालण्याचा प्रयत्न करीत असतो. हा बदल रचनेच्या, आकृतीबंधाच्या आणि विषयाच्या संदर्भात ठसठसशीतपणे जाणवत असतो. महेश एलकुंचवारं म्हणतात

''रंगमंचावर सर्वात महत्वाचं असतं ते नटाचं शरीर आणि ते शरीर मन व्यक्त करण्यासाठीच धडपडत असते. या मनाचा शोध घेणे हीच खरी प्रायोगिकता मानवी मन अथांग आहे. आणि त्याच्या तडफडीला अंत नाही. त्याचा तळ शोधत राहणं यासाठीच प्रायोगिकता राबवावी असं मला वाटतं४.''

म्हणजेच यशअपयशाचा विचार न करता 'करुन बघणं,' नेहमीच्या साच्याची मोडतोड करणे पण आतल्या जाणीवेने तनामनापासून झटणे व सादर करणे होय.

जयंत पवार म्हणतात

'''स्व'शी इमान राखण्याची अट प्रथम मानणारा कलावंत नित्यबदल हाच स्थायीभाव असणाऱ्या जीवनाशी समकक्ष राहण्यासाठी प्रयोग करत असतो.... प्रयोगशील राहण्याची / असण्याची गरज सच्चा कलावंताला असतेचं. वास्तविक नाटक ही बहिर्मूख कला मानली जाते..... नाटक प्रेक्षकांसाठी असतंच पण ते जेव्हा केवळ प्रेक्षकासाठी असत नाही... स्वत:साठी असतं किंबहुना प्रेक्षकापेक्षा स्वत:साठीच्या गरजेतून सादर होतं तेव्हा प्रयोगशील होतं५.''

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.





**प्रायोगिक नाटकाची संकल्पना :**

मराठी नाटक व मराठी रंगभूमीचा विचार केल्यास मराठी नाटक विष्णुदासांपासून (१८४३) खऱ्या अर्थाने जन्मास आले असे वाटते. तसेच ते जेव्हा जन्मास आले ते मुळात प्रयोगशील वृत्तीतूनच व प्रयोग म्हणूनच. साहित्यात १९४० – १९४५ या सुमारास नवतेची जाणीव निर्माण झालेली दिसते. नाट्यकलाप्रकारात, नाट्य वाङमयात १९६० नंतर प्रायोगिकता आली. याच काळात चळवळ म्हणून प्रायोगिक नाटक, प्रायोगिक रंगभूमी ही संकल्पना रुजू लागलेली दिसते. नाटककारांनी नव्या आशयांना विषयांना आपल्या पध्दतीने समजावून घेतले व आतल्या जाणीवेने मांडले. लेखकांनी, दिग्दर्शकांनी, कलांवतांनी तंत्रज्ञानी एकत्र येऊन प्रायोगिक नाट्यचळवळ सुरु केली. 'संगीत सौभद्र,' 'सवाई माधवराव यांचा मृत्यू,' 'एकच प्याला', हे प्रयोगच होते. विभा देशपांडे म्हणतात

> ''दुसरे महायुध्द झाल्यावर अनेक प्रश्न निर्माण झाले. माणूस आपल्या अस्तित्वाचा शोध निरनिराळ्या स्तरांवर घेऊ लागला. विज्ञानाने जशा व्यवहारिक सुखसोयी आणल्या तसेच काही नवे प्रश्न निर्माण केले. सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक स्वरुपांच्या प्रश्नांत यांच्याशी आपले नाते काय ? माणसातल्या नातेसंबंधाचा नेमका अर्थ काय ? अशा विचारांच्या, प्रश्नांच्या वाटेने येता येता आपण नाटक या माध्यमात आज काय मांडत आलो ? ते सांगणे, मांडणे आणि आपले वर्तमान प्रश्न, अनुभव यांचा संबंध काय ?..... मुळात नाट्यमाध्यमाची प्रयोजने कोणती याचा विचार नव्याने सुरु झाला. पारंपरिक पध्दतीने एखादी गोष्ट सांगण्यासाठी हे माध्यम वापरु नये, तर आपला अनुभव सांगणे महत्त्वाचे आहे. माणसाच्या मनाचा शोध, त्याचे अंत:संघर्ष कोणते आहेत. या 'मी' चे आणि समाजव्यवस्थेचे नाते काय आहे ? असे प्रश्न काही नाट्यलेखकांना सतावू लागले. हे प्रश्न कधी पाश्चात्य कलाकृतीमुळे समोर आले, कधी स्वानुभवातून, स्वविचारातूनही निर्माण झाले. जेव्हा असे प्रश्न सृजनशील

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

लेखकाला पडतात, तेव्हा त्याला परंपरेची चौकट असह्य होते. तो ती चौकट मोडायचा प्रयत्न करतो, प्रस्थापिताला आव्हान देतो. त्यातून प्रायोगिकता जन्म घेते. नाटकाच्या संदर्भात रंगमंचावरील प्रयोग गृहीत धरुनच नाटयलेखनातील प्रायोगिकता तपासून पाहावी लागते. ज्या लेखनामुळे रंगभूमीतील पारंपरिकतेचा, तंत्रविशेषांचा चौकटीचा आपल्याला पुनर्विचार करावा लागतो ते नाटक अथवा ती रंगभूमी प्रायोगिक ठरते[६]''

वि.भा.चं हे मत रास्त आहे लेखकानी लिहिलेले नाटक त्याला पडलेल्या प्रश्नामधून, स्वानुभवातून, जे आता काही केल्या मांडावच लागणार आणि ते जेव्हा 'आतून' आणतो तेंव्हाच तो नवे, रसरशीत लिहीतो आणि घडवतो.


''पारंपरिक नाटकापेक्षा काहीसे वेगळेपण प्रायोगिक नाटकात पहावयास मिळते. हे वेगळेपण नाट्यबीज, नाट्यविषय, आशय आणि रचनांतून जसे येते तसेच ते नाट्यप्रयोग, नेपथ्य यातूनही येत असते. त्यामुळे नाटकात प्रयोगक्षमता येत असते.[७]''

**'प्रायोगिक नाटकांचे बदलते स्वरुप' :**

- १९४६ नंतर मुंबईत माधव मनोहर यांनी नाट्यलेखनात व आत्माराम भेंडे यांनी दिग्दर्शनात प्रयोग केल्याचे दिसून येते.
- इब्राहीम अल्काझी ह्या प्रतिभावंत दिग्दर्शकाने पाश्चिमात्य नाटकांचे प्रयोग केले ते १९५० साली.
- १९५०–५१ सालात एकांकिका स्पर्धेला सुरुवात झाली त्यातून विजय तेंडूलकर, रत्नाकर मतकरी, विजया मेहता, दामू केंकरे, अरविंद देशपांडे, माधव वाटवे. कमलाकर सारंग, सुलभा देशपांडे यांनी नवी नाटके लिहिली, दिग्दर्शीत केली. नव्यानाटकांचे, नव्या घडणीचे, बाजाची नाटके रंगभूमीवर येऊ लागली त्याच काळात आलेल 'श्रीमंत' हे विजय तेडुंलकरांच नाटक.
- पुरुषोत्तम रेगे यांनी पुस्तकरुपाने प्रकाशित केलेली नाटके प्रायोगिक स्वरुपाचीच होती.
- एकूणच मराठी रंगभूमीला प्रायोगिक रंगभूमीचे स्वरुप प्राप्त होत होते. नाटकाची विशिष्ट नेहमीची चौकट मोडणे, अनुभवातून नाट्यअनुभव उभा करणे आणि सादर करणे, त्याच्या आकृतिबंधात नाविन्य आणणे, आशय आणि अभिव्यक्तीत स्वातंत्र घेणे, स्थळ, काळ, रचना, नेपथ्य, अभिनय, तंत्र यात जाणीवपूर्वक बदल घडविणे. प्रा. रमेश देशमूख म्हणतात

''नव्या जाणीवेचे लेखक आता नाटकाकडे एका वेगळ्या दृष्टीने, नव्या दृष्टीने पाहू लागले. रंगभूमीवरचे साचलेपण, तोच तोपणा यांचा त्यांना तिटकारा येऊ लागला. हे साचलेपण दूर सारुन रंगभूमीवर नवता साकार करण्याची त्यांची धडपड सुरु झाली. विविक्षित अनुभवाच्या निमित्ताने जीवनाचा शोध घेण्याचे प्रयत्न त्यांनी आपल्या नाटकातून सुरु केले. मानवी जीवनाचा, या जीवनातील विविध नात्यांचा मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न नाटककार करु लागले. त्यातूनच नाट्यरचने बाबतचे संकेत त्यांनी नाकारावयास सुरुवात केली. प्रतिकात्मकता, अपरिचित सूचकता इत्यादी बाबींचा स्वीकार या नव्या जाणीवेच्या नाटककारांनी करावयास सुरुवात केली. त्यातूनच प्रायोगिक नाटक आकारास आले[८].''

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.




सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, जागतिक घडामोडी, अनेक प्रश्नाची घालमेल लेखकांच्या नाटकांच्या लिखाणात दिसून येते. १९७० नंतर 'गिधाडे', 'अवध्य', 'षड्ज', 'सखाराम बाईंडर', 'घाशीराम कोतवाल', 'गार्बो', 'वासनाकांड', 'उद्ध्वस्त धर्मशाळा', 'महानिर्वाण', 'पार्टी', 'लोककथा, ७८', 'अलवराडाकू', 'घोटभर पाणी', 'छिन्न', अशी एकापेक्षा एक सरस प्रायोगिक नाटके रंगभूमीवर आली. तसेच भारतीय भाषांमधील महत्वाच्या नाटकांचे अनुवादाचे ही प्रयोग झाले 'हयवदन', 'जुलूस', 'आणखी एक द्रौणाचार्य'. ऐंशीच्या दशकात श्याम मनोहर यांनी 'यकृत', 'हृदय', 'प्रेमाची गोष्ट', इ. तसेच राजीव नाईक, मकरंद साठे, अजित दळवी, जयंत पवार, दत्ता भगत, सुरेश चिखले, प्रशांत दळवी, तुषार भद्रे, संजय पवार, चंद्रशेखर फणसळकर, दत्ता भगत, या काळातील नाटककारांना प्रायोगिक रंगभूमीवर नाना विविध प्रयोग करत रंगभूमी समृध्द केलेली दिसून येते.







 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

**निष्कर्ष :**

यावरुन एक बाब समोर येते. या नाटकांनी व नाटककारांनी प्रायोगिक नाटकांची चळवळ, निर्माण केली तसेच नाट्यसंहिता आणि प्रयोग या संदर्भात प्रेक्षकांचे आणि नाट्यकलावंताचे समज आणि आकलन समृध्द केले. प्रायोगिक रंगभूमीमुळे पारपरिक विचारांच्या सिमा, तोडण्यास मदत झाली, अशक्य गोष्टी शक्य झाल्या. रंगमंचीय घटकांमध्ये प्रायोगिकतेचे अंश व पूर्णत्व येऊ लागले. नव लेखकांमध्ये, नाटककारांमध्ये, दिग्दर्शकांमध्ये प्रयोगशिलवृत्ती निर्माण झाली. नाटकाच्या समग्र आशय, विषय, अभिव्यक्ती, घाट, अभिनय शैलीत, दिग्दर्शन शैलीत अनेक बदल होत संकेतांची मोडतोड होत बदल केले गेले आणि आविष्काराच्या अनेक नाविण्यपूर्ण कल्पना, शक्यता निर्माण झाल्या. प्रायोगिक रंगभूमीला अभिव्यक्तीसाठी स्वविचारांचे पाठबळ मिळाले. मराठी रंगभूमीला प्रायोगिक रंगभूमीने जीवंत नविन नाट्यानूभव दिला. रंगभूमीचं अस्तीव शाबूत ठेवण्यासाठी प्रायोगिक रंगभूमीचे महत्व तितकेच महत्वाचे आहे.







 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

## संदर्भसूची


१. माळी, वीणा. 'नाटकांचा आकृतीबंध', प्र.क्र. २१५.

२. नाईक, राजीव. 'नां नाटकातला', पदमगंधा प्रकाशन, पुणे प्र.क्र.६८.

३. आमची श्री वाणी. १९९९ / २०००. प्र.क्र. ५२.

४. माळी, वीणा. 'तैत्रव', प्र. क्र. २१६.

५. डॉ.प्रभूणे, अरुण (संपादक). 'अक्षरयात्रा', २००८ – २००९, प्र. क्र. ३५

६. देशपांडे, वि.भा. 'मराठी नाटक: स्वातंत्र्योत्तर काल' (१९४७–९०). व्हीनस प्रकाशन, पुणे. प्र.क्र. ११७.

७. देशमुख, रमेश. '१९७० नंतरच्या मराठी प्रायोगिक नाटकांचा अभ्यास' प्र.क्र. ५६.

८. देशमुख, रमेश. 'तैत्रव' प्र. क्र. ६२.


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.